# महाराष्ट्राचे 'दादा' हरपले...!



## आता दादा कोणाला म्हणायचे....

## विमानातील पाचही प्रवाशांचे निधन

प्रतिनिधी २८ जानेवारी

**बारामती :** महाराष्ट्राच्या राजकारणातील दादा आज हरपले. लाडक्या बहिणींचे दादा हरपले. सामान्य कार्यकर्त्यांचे दादा हरपले. सामान्य लोकांच्या हक्कासाठी लढणारे दादा हरपले, महाराष्ट्राचे दादा हरपले. आता दादा म्हणून हाक कोणाला मारायची, असा प्रश्न प्रत्येक मराठी मनाला विचारला जात आहे. जाहीर सभेत दादांना हाक दिली की, उत्स्फूर्त प्रतिक्रिया देणारे दादा आज आमच्यात नाही. अजित दादा यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र पोरका झाला आहे. महाराष्ट्राचे खंबीर नेतृत्व, लोकांचा विश्वास असलेले कणखर नेतृत्व आज काळाच्या पडद्या आड गेले आहे. 'विकासाचा वादा अजित दादा' हे वाक्य मात्र आता कायम स्मरणात राहील.महाराष्ट्राने एक प्रभावी नेते, कार्यकर्त्यांचा सखा आणि विकासपुरुष गमावला आहे.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार (६६) यांचे आज सकाळी निधन झाले आहे. बुधवारी सकाळी बारामती येथे त्यांचे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान हा अपघात झाल्याचे वृत्त आहे. विमानात त्यांच्यासोबत असलेले त्यांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा कर्मचारी आणि विमान कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, पवार एका खासगी चार्टर्ड विमानाने मुंबईहून बारामतीला गेले होते. लँडिंग दरम्यान विमान धावपट्टीवरून घसरले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) या अपघातात पाच जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. सुरुवातीला सहा जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त होते. महाराष्ट्र पंचायत निवडणुकीसाठीच्या चार सभांना उपस्थित राहण्यासाठी अजित पवार बारामतीला जात होते. अपघाताची माहिती मिळताच पवारांचे कुटुंबीय त्यांच्या मुंबईतील निवासस्थानावरुन रवाना झाले आहेत.

### अपघातात या सर्वांचे निधन

१. अजित पवार
२. मुंबई पीएसओ विदीप जाधव
३. पायलट कॅप्टन सुमित कपूर
४. कॅप्टन शांभवी पाठक
५. पिंकी माळी, फ्लाईट अटेंडंट

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०१ ■ बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

महाराष्ट्राच्या राजकारणावर खोलवर प्रभाव टाकणारे 'दादा' अजित पवार यांचा संघर्षातून सत्तेपर्यंतचा प्रवास, उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी, मोठे निर्णय, राजकीय उलथापालथी आणि राज्याच्या विकासात दिलेले योगदान यांचा थोडक्यात पण सखोल आढावा. अजित अनंतराव पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या गावी झाला. त्यांचे वडील अनंतराव पवार आणि आई आशाताई पवार. बालपणापासूनच त्यांना कष्टकरी शेतकरी जीवनाची ओळख होती. वडिलांच्या अकाली निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी लवकरच त्यांच्यावर आली. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण न करता त्यांनी बारामतीत राहून सामाजिक आणि सहकारी क्षेत्रात काम सुरू केले. बारामती हे त्यांचे राजकीय कर्मक्षेत्र बनले आणि नंतर ते याच ठिकाणचे अजेय प्रतिनिधी म्हणून ओळखले गेले.



### विमान धावपट्टीवरुन बाजूला गेलं, अन्...

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा सकाळी बारामतीमध्ये भीषण अपघात झाला. बारामती विमानतळावर लँडिंग करण्याच्या प्रयत्नात असतानाच त्यांचं विमान शेतात कोसळलं, त्यानंतर विमानाला भीषण आग लागली. पहिल्या प्रयत्नात विमान खाली उतरले नाही, दुसऱ्या प्रयत्नात ते अपघात ग्रस्त झाले. कॅप्टनचे शेवटचे वाक्य होते ओ...शिट... अजित पवार कॅबिनेटच्या बैठकीसाठी ते मुंबईत आलेले होते, त्यानंतर आज ते आज सकाळी ते मुंबईहून खासगी विमानाने बारामतीकडे रवाना झाले होते. सकाळी ९ ते ९:१५ च्या सुमारास बारामती विमानतळावर लँडिंगच्या प्रयत्नात असताना विमान तांत्रिक कारणामुळे धावपट्टीवरून बाजूला गेल्याची माहिती मिळत आहे. तांत्रिक बिघाडामुळे विमान धावपट्टीवर उतरण्याऐवजी शेजारी असलेल्या एका शेतात आदळलं. विमान कोसळताच क्षणार्धात भीषण पेट घेतला. बघता बघता संपूर्ण विमान आगीच्या भक्ष्यस्थानी आलं आणि जळून खाक झालं. या अपघातानंतर घटनास्थळावरून धुराचे मोठे लोट पसरले.

**राज्यात तीन दिवसांचा दुखवटा...!**

### युगेंद्र पवारांना रडू कोसळले

अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांना या दुर्घटनेची माहिती मिळताच रडू कोसळले. युगेंद्र पवार यांनी अजित पवार यांच्याविरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती. दिवंगत नेते अजित पवार मंगळवारी मुंबईत होते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र कॅबिनेट कमिटी ऑन इन्फ्रास्ट्रक्चरच्या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीला महाराष्ट्राचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर अधिकारीही उपस्थित होते.

### मंत्रिपद आणि उपमुख्यमंत्रीपद

अजित पवार यांनी महाराष्ट्रात विविध काळात जलसंपदा, कृषी, ग्रामविकास, नियोजन, ऊर्जा अशा महत्त्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणून काम पाहिले. त्यांनी चार वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात जलयुक्त शिवार, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, सिंचन प्रकल्पांची गतीमानता, ग्रामीण रस्ते विकास अशा अनेक योजना प्रभावीपणे राबवल्या गेल्या. प्रशासकीय कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी ते प्रसिद्ध होते. 'फाइल्सवर लवकर निर्णय घ्या, काम अडकवू नका' हा त्यांचा नेहमीचा आदेश होता.

### वैयक्तिक जीवन आणि व्यक्तिमत्व

अजित पवार यांचा विवाह सुनेत्रा पवार यांच्याशी १९८५ मध्ये झाला. त्यांना दोन मुले - पार्थ आणि जय. सुनेत्रा पवार या स्वतः राजकारणात सक्रिय आहेत. अजित पवार यांना 'दादा' हे नाव अनुयायांकडून प्रेमाने दिले गेले. ते नेहमीच जनतेशी थेट संवाद साधत, जनता दरबार घेत. सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात, रात्री उशिरापर्यंत बैठकांचे सत्र, हे त्यांचे नियमित जीवन होते. क्रिकेट, टेनिस, खो-खो अशा खेळांमध्ये त्यांची आवड होती. शेतकरी, ग्रामीण भाग आणि सहकारी क्षेत्र हे त्यांचे मुख्य फोकस होते.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायक - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

"बारामतीत झालेल्या विमान दुर्घटनेबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांचे अकाली निधन ही अपूरणीय हानी असून महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकारी क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी त्यांची कायम आठवण राहील, असे त्यांनी नमूद केले आहे. राष्ट्रपतींनी पवार कुटुंबीयांसह समर्थक आणि चाहत्यांप्रती शोकसंवेदना व्यक्त करत या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्वांच्या कुटुंबीयांना या आघाताला सामोरे जाण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना केली आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अजित पवारांना श्रद्धांजली

"महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. अजित पवार हे लोकनेते होते आणि त्यांचा तळागाळातील जनतेशी मजबूत संपर्क होता, असे पंतप्रधान म्हणत आहेत. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत नेहमीच अग्रभागी राहणारे, परिश्रमी आणि कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा मोठा सन्मान होता, असेही त्यांनी नमूद केले आहे. प्रशासनाची सखोल समज आणि गरीब व वंचितांच्या सक्षमीकरणासाठी असलेली त्यांची तळमळ उल्लेखनीय होती, असे पंतप्रधान सांगत आहेत. अजित पवार यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक आणि दुःखद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली असून कुटुंबीय आणि असंख्य चाहत्यांप्रती त्यांनी संवेदना व्यक्त केल्या आहेत. ओम शांती, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### अजितदादाचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले - नितीन गडकरी

"महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुर्दैवी आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. गेली अनेक वर्षं राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळे अजितदादांचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचे अकाली निधन होणे, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो.

### अजित पवार यांची राजकीय कामाची स्वतःची एक वेगळी शैली होती - प्रकाश आंबेडकर

"महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने तीव्र धक्का बसला आहे! तुम्हाला ते आवडले असो वा नसो, अजित यांची राजकीय कामाची स्वतःची एक वेगळी शैली होती.त्यांच्या पत्नी, कुटुंब, मित्र आणि अनुयायांप्रति माझ्या मनःपूर्वक संवेदना. ज्या विमान अपघातात त्यांचा आणि इतर ५ व्यक्तींचा जीव गेला, त्या घटनेची योग्य चौकशी होणे आवश्यक आहे.

### दादा पर्वाच्या राजकारणाचा अकाली अस्त

अत्यंत गंभीर अवस्थेमध्ये अजित पवारांसह जखमींना बारामतीमध्येच उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे अजित पवार यांच्या 'दादा' पर्वाच्या राजकारणाचा अकाली अस्त झाला आहे. राज्याच्या राजकारणामध्ये गेल्या साडेचार दशकांपासून अजित पवार हे गारुड सातत्याने सर्वाधिक चर्चिलं गेलं आहे. त्यांची धडाडी, राष्ट्रवादीचे एकहाती नेतृत्व आणि शरद पवारांचे वारसदार म्हणून अजित पवार यांच्याकडे सातत्याने पाहिलं जात होतं. मात्र, अजित पवार यांच्या अकाली जाण्याने पवार कुटुंबीयांसह अवघ्या राज्याला मुळापासून हादरा बसला आहे.

### साडे चार दशकांपासून राजकारणात

अजित पवार यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी आहे. मात्र त्यांचा जन्म अहमदनगर जल्हियातील राहुरी तालुक्यातील देवळाली (प्रवरा) या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी अजित पवार मुंबईत आले, शिक्षण पूर्ण करून बारामतीला आले आणि तेथील सहकारी संस्थांमधून त्यांनी सामाजिक व राजकीय कार्याला सुरुवात केली. अजित पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केला. त्याचवर्षी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर त्यांची निवड झाली. तेव्हापासून ते अखेरचा श्वास घेण्यापर्यंत ते राजकारणात सक्रिय राहिले. अजित पवार यांनी १९९१ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

### शरद पवारांच्या वाढदिवशी एकत्र...

पवार कुटुंबीयांचे वलय महाराष्ट्रासाठी नवीन नाही. गेल्या सहा दशकांपासून पवार कुटंबीयांचं गारुड समाज आणि राजकारणावर राहिलं आहे. शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर अजित पवार यांनी केलेल्या बंडानंतर त्याची दोन शकले झाली. त्यामुळे कुटुंबातही विसंवाद झाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून झालं गेलं विसरून गेलं म्हणत अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील राजकीय वादाची दरी कमी झाली होती. १२ डिसेंबर रोजी शरद पवार यांच्या वाढदिवस दिनी अजित पवार एकत्र जमले होते. त्यानंतर बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानमध्ये झालेल्या कार्यक्रमातही हे काका पुतण्या एकत्र आले होते. महानगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा रंगली होती. मात्र, काळाने घातलेल्या झडपेत या सर्व आठवणी आता भुतकाळात गेल्या आहेत.

### गावकऱ्यांनी सांगितले की विमान उतरताना स्फोट झाला

बारामती विमानतळाजवळील एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, 'मी स्वतःच्या डोळ्यांनी ते पाहिले. ते भयानक होते. विमान घसरले तेव्हा आम्हाला माहीत होते की ते कोसळेल आणि नेमके तेच घडले. विमान उतरताच एक मोठा स्फोट झाला. आम्ही ताबडतोब घटनास्थळी धावलो आणि विमान आगीत बुडालेले पाहिले. त्यानंतर आणखी चार-पाच स्फोट झाले. अनेक लोक आले आणि लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला, पण आग इतकी मोठी होती की आम्ही काहीही करू शकलो नाही. अजित पवार विमानात होते आणि जे घडले ते भयानक होते. मी ते शब्दात वर्णन करू शकत नाही.

### दमदार आणि दिलदार मित्र मला सोडून गेला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक

"आज सकाळी एक दुःखद घटना घडली. अतिशय अनाकलनीय परिस्थितीत विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. खरं तर अजितदादा पवार हे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, जनतेची जाण असलेले असे ते नेते होते. जनसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड आस्था होती. अजितदादा हे संघर्षशील नेतृत्व होते. न डगमगता पुढे जाणारे ते नेतृत्व होते. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस अतिशय कठीण आहे. अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात. महाराष्ट्राच्या विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांचं जाणं अविश्वसनीय आहे. दमदार आणि दिलदार मित्र मला सोडून गेला. त्यांच्या कुटुंबावरही हा प्रचंड मोठा आघात आहे. मी आणि एकनाथ शिंदे बारामतीला निघणार आहोत. नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्याशी तसेच सर्वांशी चर्चा केली असून, त्यांना घडलेल्या घटनेची कल्पना दिली आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण देशात हळहळ पसरली आहे.



### दादा गेले नाहीत तर आम्ही पोरके झालो...

शब्दाला जागणारा आणि कार्यकर्त्यांना खऱ्या अर्थाने बळ देणारा आमचा मार्गदर्शक आदरणीय अजित दादा आज आमच्यात नाहीत यावर विश्वास बसणे अशक्य आहे. मला वेळोवेळी त्यांचे मार्गदर्शन मिळत असे एकदा त्यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू केल्यानंतर ते प्रत्येक कार्यकर्त्यांची आपुलकीने चौकशी करीत असत त्यांच्या जाण्याने आज राष्ट्रवादी काँग्रेस संपूर्णपणे पोरकी झाली आहे पक्षासोबतच माझे वैयक्तिक खूप मोठे नुकसान झाले आहे हे नुकसान कधीही भरून न येण्यासारखे आहे आज खऱ्या अर्थाने राज्याला त्यांच्या नेतृत्वाची गरज होती असा खंबीर करारी रुबाबदार आणि प्रशासनावर वचक असलेला नेता आपल्यातून जाणे हे महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजय भाऊ देशमुख यांनी व्यक्त केली....

CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती
बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## लाडकी बहीण' योजनेचा घोळ उघड; ३०० महिलांचे पैसे रखडले

**अमरावती :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तीनशेहून अधिक महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे गेल्या तीन महिन्यांपासून पैसे मिळाले नसल्याने संतप्त महिलांनी सोमवारी अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन केले. रखडलेल्या लाभाबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी महिलांनी यावेळी लावून धरली. जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी आंदोलनकर्त्या महिलांचे निवेदन स्वीकारले. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश सावळे यांनी केले.

चौकशीत केवायसी (ख्प्ण्) प्रक्रियेदरम्यान चुकीची माहिती भरली गेल्यामुळे संबंधित महिलांचे पैसे अडकल्याचे समोर आले आहे. या संदर्भात महिलांनी यापूर्वी महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता; मात्र समाधानकारक माहिती न मिळाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात आला.

# अन् अजितदादांची अंबा नगरीतली ती प्रचार सभा ठरली शेवटची

### ◆ मतदारांची जिंकली होती मने ◆ अजित दादांच्या जाण्याने सर्वच पक्षाच्या नेत्यांना मोठा धक्का




संदीप मानकर २८ जानेवारी

**अमरावती:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा बारामतीत विमान अपघातात अकाली मृत्यू झाला. ही दुर्घटना अमरावतीकरांना कळताच सर्वच पक्षातील नेत्यांना मोठा धक्का बसला असून त्यांच्या प्रति असलेले प्रेम व आदरामुळे सर्व स्तरावर शोकवेदना व्यक्त होत आहे.

मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांच्या प्रचारासाठी काही आठवड्यांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार अमरावतीत येऊन गेले. संत गाडगेबाबा समाधी मंदिरासमोरील मैदानात त्यांची जाहीर सभा पार पडली. ती सभा अंबा नगरीतील त्यांची शेवटची सभा ठरल्याच्या भावना अमरावती करांमध्ये व्यक्त होत आहेत.

या सभेमध्ये त्यांच्या दमदार शैलीत त्यांनी मतदारांना संबोधित केले.

त्यादिवशी त्यांचा घसा (गळा) खराब असतानाही त्यांनी वीस मिनिटापेक्षा जास्त भाषण केले. अमरावती करांची यांनी या भाषणातून मने जिंकली. येणाऱ्या अर्थसंकल्पात कोट्यावधी रुपयांचा निधी कसा अमरावतीला देता येईल? याबद्दल त्यांनी सविस्तर सांगितले.

मात्र त्यांच्या जाण्याने अमरावतीचे आमदार सुलभा खोडके व आमदार संजय खोडके या खोडके दांपत्यांचा मोठा आधार असलेले अजित दादा पवार अचानक निघून गेल्याने त्यांच्यावरही दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे आता दादांची सभा अमरावतीला कधीच होणार नाही. ही कल्पनाही अमरावतीकरांसाठी मोठी वेदना देणारी ठरली आहे. सर्वपक्षीय नेत्यांमध्ये त्यांच्याबद्दल असलेले प्रेम, व आदर यामुळे सर्वच पक्षातील नेत्यांना अजितदादांनी असे अकाली एक्झिट घेतल्याने धक्का बसला आहे.

#### अमरावती विमानतळावर नाईट लँडिंग बद्दल केले होते वक्तव्य

या सभेतील भाषणात अमरावती हे विभागीय सेंटर असून अमरावतीत विमानतळ साकारला गेले आहे. त्या कार्यक्रमालाही मी होतो. मात्र अमरावती मधून एक नव्हे तर तीन विमाने उडतील व नाईट लँडिंग साठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी मोठी धावपट्टी ही वाढवावी लागणार आहे. असे त्यांनी सांगितले. त्यासाठी राज्याची तिजोरी माझ्याकडे असून मी अर्थमंत्री असल्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल. असेही त्यांनी मिस्कीलपणे सांगितले होते. मात्र आता अमरावती विमानतळावर कधीच दादांचे विमान उतरणार नाही. ही कल्पनाही अमरावतीकरांसाठी वेदनादायी ठरली आहे.

#### निधी पाहिजे असेल तर दादांच्या कानात सांगा

नुकतीच अमरावतीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आमदार सुलभा खोडके व आमदार संजय खोडके यांनी अमरावतीच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयाचा निधीची तरतूद करावी. अशी मागणी केली. त्यावर चंद्रशेखर बावनकुळे विनोदाने म्हणाले की दादा अर्थमंत्री आहेत. अमरावतीच्या निधी संदर्भात त्यांच्या कानात सांगा, म्हणजे निधी मिळेल. त्यावर उपस्थिततांमध्ये हशा पिकला. मात्र, आमदार सुलभा खोडके म्हणाल्या की, अजितदादांचे आम्ही कानात सांगणार नसून त्यांना थेट समोरासमोर सांगून अमरावतीच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात येईल. अशी जुगलबंदी डीपीसी च्या बैठकीत रंगली होती. मात्र दादांच्या अशा जाण्याने अमरावतीच्या विकासाचे स्वप्न अधुरे राहिल्याचे भावना व्यक्त होत होत्या. आता फक्त आठवणी उरले असून सर्वच पक्षाच्या नेत्यांनी दादांना भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त केली आहे.

## व्यंकय्यापुरा येथे भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन साजरा

### ◆ आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी २८ जानेवारी



**अमरावती :** संपूर्ण देश तिरंगामय होऊन देशभक्ती व राष्ट्रप्रेमाच्या भावनेने ओतप्रोत होत असतांना व्यंकय्यापुरा हा मागे कसा राहणार, तेथील जनतेनेही दाखवून दिले कि, ठहम इस देश के वासी है..' देशभक्तीचा हा बाणा प्रत्येक भारतीयांच्या मनात असाच तेवत राहो, अशा शब्दात अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. अमरावती महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक- ८ जोग स्टेडियम अंतर्गत व्यंकय्यापुरा येथे सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी आयोजित ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दीना निमित्य आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगाणं करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण केली. तत्पूर्वी थोर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासह लोकशाही राष्ट्र घडविण्यासाठीं अमूल्य योगदान देणाऱ्या थोर महापुरुषांचे तसेच भारत मातेच्या महान सुपुत्रांच्या कार्याचे स्मरण करून यावेळी त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. पुढे बोलतांना आमदार सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या कि सुरुवातीला देशाला स्वातंत्र्य, समाज सुधारणा व परिवर्तनाची व विकासाची गरज होती. त्यामुळे ७७ वर्षात भारत देशाने मोठे यशोशिखर गाठले असून देश सर्वच क्षेत्रात प्रगत, उन्नत व अग्रेसर आहे.समृद्ध विकासाचा हा वसा पुढे अविरतपणे जोपासण्यासाठी सर्वांनी देशप्रेम, राष्ट्रभक्ती, पुरोगामी विचार, लोकशाही, धर्मनिरपेक्षता अशी शिकवण आत्मसात करून समाजाच्या विकासात हातभार लावण्याचे आवाहन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी केले. यावेळी व्यंकय्यापुरा येथील सामाजिक कार्यकर्ता सचिन निकम व स्वाती निकम यांनी श्री. यश सुलभा संजय खोडके यांचा यथोचित सत्कार केला. यश खोडके यांनी सुद्धा सर्व उपस्थितांना गणराज्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला स्वाती निकम, सचिन निकम, गिरीश मडावी, सुमित कुमरे, संजूभाऊ घोडे, सतीश लायबर, मनोज भेंडे, अमित दिवे, ऋषिकेश शिरपूरकर, वाल्मिक इंगोले, राजेश बागडे, अमर वाहुरवाघ, सतीश यादव, बबलू राजपूत, विशाल राजपूत, सुनील चक्रे, शिशुपाल काळे, हरीशभाऊ मडावी, मुकेश अनपल, कैलास करवाडे, विठ्ठल मानकर, गजू यादव, विष्णू गवई, सोनू सहारे, रवी काकडे, राहुल पंचबुद्धे, आशिष गावंडे, शुक्रल खोब्रागडे, रोहन यादव, तेजस कांबळे, गोलू मुराई, लखन मुराई, प्रसन्न गाडे, यश बोधनकर, आदींसह महिला भगिनी, युवक बांधव, जेष्ठ नागरिक तसेच व्यंकय्यापुरा येथील नागरिक.प्रामुख्याने उपस्थित होते.

## कीर्ती पिंजरकर यांच्या 'कौटिल्यप्रणीत सुशासन आणि प्रशासन तंत्र'

### ◆ ग्रंथाचा अमरावतीत दिमाखदार प्रकाशन सोहळा

प्रतिनिधी २८ जानेवारी



**अमरावती, :** येथील बडनेरा रोडवरील श्री हरिचंद्र हॉटेलमध्ये शनिवार, २४ जानेवारी रोजी डॉ. कीर्ती राम पिंजरकर लिखित आणि पद्यगंधा प्रकाशन, पुणे द्वारे प्रकाशित 'कौटिल्यप्रणीत सुशासन आणि प्रशासन तंत्र' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साहात आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या मांदियाळीत पार पडला. इ.स. पूर्व चवथ्या शतकात कौटिल्याने मांडलेले नैतिकता व सचोटीचे विचार आजही सुसंगत असल्याचे प्रतिपादन उद्घाटक तथा माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

**मान्यवरांची उपस्थिती**

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय होते. विशेष अतिथी म्हणून रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावंकर, लेडी गर्व्हनर डॉ. कमलताई गवई उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून संस्कृत व भारतीय इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा. हेमंत राजोपाध्ये यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर पद्यगंधा प्रकाशनचे अभिषेक जाखडे आणि सिद्धार्थ प्रकाशनचे शिवाजी धुरी यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

**कौटिल्य : केवळ इतिहास नव्हे, तर भविष्याचा मार्ग**

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी आपल्या भाषणात कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकला. डॉ. कीर्ती पिंजरकर यांनी कौटिल्याच्या विचारांना आधुनिक संदर्भात मांडून प्रशासनासमोर एक नवा आदर्श ठेवला असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते प्रा. हेमंत राजोपाध्ये यांनी ग्रंथाचे विश्लेषण करताना सांगितले की, ठकौटिल्याने केवळ राज्यव्यवस्थाच मांडली नाही, तर 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' या सूत्रावर आधारित समाजव्यवस्था निर्माण केली. या पुस्तकात भ्रष्टाचाराचे ४० प्रकार, आपत्ती व्यवस्थापन आणि अगदी तृतीयपंथीयांचा प्रशासनातील सहभाग यांसारख्या आधुनिकोत्तर विषयांवर केलेले विवेचन लेखिकेच्या सखोल अभ्यासाची पावती देते.

**ग्रंथाचे वेगळेपण**

या ग्रंथात कौटिल्यकालीन प्रशासनातील अनेक धाडसी आणि प्रगत विषयांचा समावेश करण्यात आला आहे, जसे की:

प्रशासन यंत्रणा: सनदी नोकरवर्गाची भरती, पदोन्नती, बदली आणि निवृत्तीवेतनाचे नियम. सामाजिक अधिकार: स्त्रियांचे आर्थिक अधिकार, गर्भपात, स्वेच्छामृत्यू आणि समलिंगी संबंधांबाबतचे तत्कालीन कायदे. आर्थिक शिस्त: भ्रष्टाचार निर्मूलन, कर प्रणाली आणि बनावट चलनावर नियंत्रण.

लोककल्याण: आपत्ती व्यवस्थापन आणि शेती विकासासाठी राज्यकर्त्यांची कर्तव्ये.

# धामणगाव रेल्वेत वाळू माफियांचा उच्छाद

### ◆ महसूल-पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने दररोज ५० लाखांची लूट, गरिबांवर मात्र दंड-धमक्यांचा कहर!

प्रतिनिधी २८ जानेवारी



**अमरावती / धामणगाव रेल्वे :** धामणगाव रेल्वे तालुक्यातील गोकुळसरात बोरगाव निस्ताने येथील रेतीघाटावर वाळू माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, महसूल व पोलीस प्रशासनाच्या समक्ष दररोज सुमारे ५० लाख रुपयांची अवैध रेती चोरी सुरू असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी केला आहे. शासनाचे नियम केवळ गरिबांसाठीच असल्याचे दिसत असून, श्रीमंत वाळू व्यावसायिकांना मात्र नियम शिथिल करून संरक्षण दिले जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

दिनांक १ व २ जानेवारी रोजी प्रा. वीरेंद्र जगताप यांनी स्वतः रेतीघाटाची पाहणी केली असता, किमान ४० ते ६० ट्रॅक्टर, सक्शन पंप, बोटी, ताराफे, पोकलेन व जेसीबीसारखी जड यंत्रसामग्री आढळून आली. या सर्व बाबींचे फोटो, व्हिडीओ व जिओ टॅगिंगसह पुरावे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, एसडीओ व तहसीलदार यांच्याकडे सादर करण्यात आले. मात्र, इतके ठोस पुरावे देऊनही आजतागायत रेतीघाट मालकांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, हे प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारे आहे.

दरम्यान, १० जानेवारी रोजी रात्री सदर रेतीघाटावर गोळीबाराची घटना घडली असून, याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. रेती वाहतूक प्रामुख्याने रात्रीच्या वेळी सुरू असते. ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार २६ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत ५५५ वाहनांची नोंद झाली आहे. मात्र, याच कालावधीत शासनाने निश्चित केलेल्या रॉयल्टी पासची माहिती अद्याप सादर करण्यात आलेली नाही, हे संशयास अधिक बळ देणारे आहे.

या प्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी आमदार प्रताप अडसूळ यांच्याकडे तक्रार केली असता, त्यावर कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप आहे. गोळीबार प्रकरणात त्यांचे पुत्र नंदा उर्फ नवीन वाघधरणी यांचे नाव पुढे आले असताना, राजकीय दबावामुळे ते नाव एफआयआरमधून वगळण्यात आल्याचेही सांगण्यात येते.

विशेष म्हणजे, गावातील शेतकरी स्वतःच्या शेतकामासाठी किंवा घरबांधणीसाठी रेती वाहतूक करत असल्यास ५० हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत दंड व वाहन जप्ती, तर वाळू माफियांना खुले संरक्षण, असा दुजाभाव प्रशासनाकडून होत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे नियम गरिबांसाठी आणि सवलती श्रीमंतांसाठी अशी अवस्था निर्माण झाल्याने संतप्त नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

## इस्त्रो भेटीतून विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाची नवी दृष्टी

### ◆ निदा इंटरनॅशनल स्कूलची बेंगळुरु शैक्षणिक सहल यशस्वी

प्रतिनिधी २८ जानेवारी




**अमरावती :** निदा इंटरनॅशनल स्कूल, अमरावती येथील विद्यार्थ्यांसाठी दि. ३१ डिसेंबर २०२५ व १ जानेवारी २०२६ रोजी बेंगळुरु येथे आयोजित करण्यात आलेली शैक्षणिक सहल यशस्वीपणे पार पडली. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून अंतराळ विज्ञान, उपग्रह तंत्रज्ञान व संशोधन प्रक्रिया यांचे सखोल व उत्कृष्ट ज्ञान मिळाले.

या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (घ्एींध्), बेंगळुरु येथे भेट दिली. येथे शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली भारताच्या अंतराळ संशोधन कार्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. अंतराळ विज्ञान, उपग्रह प्रक्षेपण, तंत्रज्ञानाची कार्यपद्धती आणि संशोधनातील आधुनिक प्रयोग याविषयी विद्यार्थ्यांना नव्या पद्धतीने शिकविण्यात आले. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा व संशोधनाची आवड निर्माण झाली.

यानंतर विद्यार्थ्यांनी टीपू सुलतान पॅलेस येथे भेट देऊन ऐतिहासिक वारसा, स्थापत्यकला तसेच स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित महत्त्वाच्या घटनांची माहिती घेतली. तसेच लालबाग बोटॅनिकल गार्डन येथे विविध दुर्मिळ वनस्पती, फुलझाडे व निसर्गसंपदेचा अभ्यास केला. बेंगळुरु शहरामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, वैज्ञानिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून समृद्ध असा अनुभव प्राप्त झाला.

ही संपूर्ण शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व आनंददायी ठरली. सहल पूर्णपणे शिस्तबद्ध, सुरक्षित व यशस्वीपणे पार पडली. या सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद व पालकांचे सहकार्य लाभले, असे निदा इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने सांगण्यात आले.

## लग्नास नकार दिल्याने तरुणीचा पाठलाग; 'तुझं लग्न कुणाशीच होऊ देणार नाही' अशी धमकी

प्रतिनिधी २८ जानेवारी




**अमरावती :** लग्नाचा प्रस्ताव नाकारल्याच्या रागातून एका २२ वर्षीय तरुणीला धमकावून तिचा सातत्याने पाठलाग केल्याचा प्रकार अमरावतीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

तक्रारदार तरुणी व संशयित आरोपी सचिन जानराव इंगळे (वय २८, रा. शिराळा) यांची ओळख गेल्या दोन वर्षांपासून होती. याच दरम्यान आरोपीने तरुणीकडे लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र, तरुणीने स्पष्ट नकार दिल्यानंतर आरोपीने तिच्याशी असलेला संपर्क तोडला होता.

त्यानंतरही आरोपीने तरुणीचा पाठलाग सुरूच ठेवला. तो वारंवार तरुणीच्या घराच्या परिसरात फेरफटका मारत होता. अखेर २३ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास आरोपी थेट तरुणीच्या घरासमोर गेला. यावेळी ठ्ठतू माझा फोन उचलत नाहीस. जर तू माझ्याशी लग्न केले नाहीस तर तुला बघून घेईन आणि तुझं लग्न दुसरीकडे कुठेही होऊ देणार नाही, अशा शब्दांत आरोपीने तरुणीला धमकावले, असे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेनंतर तरुणीने घडलेला प्रकार पालकांना सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांसह फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तरुणीच्या जबाबावरून पोलिसांनी रविवार, २४ जानेवारी रोजी आरोपी सचिन इंगळे याच्याविरोधात पाठलाग व गुन्हेगारी स्वरूपाच्या धमकीचा गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सारिका देशमुख करत आहेत. आरोपीचा शोध सुरू असून, लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

## पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये संत गजानन महाराज पालखी सोहळा

### ◆ विद्यार्थ्यांनी सादर केलेले टाळ-मृदुंग पथक व लेझीम हे सोहळ्याचे मुख्य आकर्षण

प्रतिनिधी २८ जानेवारी





**अमरावती :** विदर्भाचे आराध्य दैवत शेगावचे श्री संत गजानन महाराज यांचा पालखी सोहळा पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे अत्यंत भक्तिमय व उत्साही वातावरणात पार पडला. उन्मेष २०२६या सांस्कृतिक महोत्सवाच्या शुभारंभानिमित्त या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सोहळ्याची सुरुवात गजानन टाऊनशिप, पोटे पाटील रोड येथील श्री संत गजानन महाराज मंदिरापासून करण्यात आली. पालखी व श्रींचे विधिवत पूजन झाल्यानंतर पालखी टाऊनशिप परिसरातून मार्गक्रमण करत महाविद्यालयाच्या परिसरात दाखल झाली. महाविद्यालयातील अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, बीएएमएस, नर्सिंग, आंतरराष्ट्रीय शाळा, कृषी, बीएड तसेच इतर विभागांच्या इमारतीसमोर संस्थेच्या मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात सहभागी होत टाळ, मृदुंग व लेझीमच्या तालावर भक्तीमय वातावरण निर्माण केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले टाळ-मृदुंग पथक व लेझीम हे सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. पालखी सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन महाविद्यालयातील प्राध्यापक व विविध विभागप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी केले. हा सोहळा सांस्कृतिक परंपरा आणि अध्यात्मिक श्रद्धेचा सुंदर संगम ठरला असून संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दिव्यांग सेवेकरी पंकज जायले यांना शासनाचा 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार'

**अकोला:** दिव्यांग व मूकबधिर वर्गासाठी जिल्ह्यात अनेक वर्षापासून अविरत सेवाकार्य करणाऱ्या स्थानीय सहकार नगर येथील रहिवासी पंकज जगतराव जायले यांना राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण मंत्रालयच्या वतीने दिल्या जाणारा 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद मध्ये आयोजित सोहळ्यात जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ तुषार जाधव व अन्य प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत पंकज जायले यांना 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार' शिल्ड, प्रमाणपत्र व रोख दहा हजार रुपयांचा धनादेश प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पंकज जायले हे अनेक वर्षापासून दिव्यांग व मूकबधिर वर्गाची सर्वकष सेवा करीत असून दिव्यांगांच्या रोजगारासाठी मोलाची कामगिरी ते बजावीत आहेत. याव्यतिरिक्त यांचा सामाजिक सेवा कार्यातही हातखंडा असून जिल्ह्यातील दिव्यांग व मूकबधिर असो.चे चेअरमन म्हणून सेवारत आहेत.

## थकित करापोटी उत्तर झोन येथील दोन मालमत्तांवर सीलची कारवाई



**अकोला:** आज दि. २७ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत दगडी पुल येथील वार्ड क्रं. सी - ३ मालमत्ता क्रं. २५० आणि २५१, धा.राजेंद्र तापडीया यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये ९,६१,९७३/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या दोन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत सहा.कर अधिक्षक विठ्ठल देवकते, सहा.कर अधिक्षक पंकज जोगळेकर, कर वसुली लिपिक संतोष सुर्यवंशी, मोहन घाटोळ, राजानंद मेश्राम आदींची उपस्थिती होती.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हिंदू संघटना आक्रमक ; तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २८ जानेवारी

**तेल्हारा :** शहर आणि तालुक्यात होणाऱ्या काही विशिष्ट लग्न समारंभामध्ये गोमांस भक्षण केले जात असल्याचा गंभीर आरोप करत, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने स्थानिक पोलीस प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला आहे. या संदर्भात ठाणेदार यांना निवेदन देऊन प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या प्रकाराबाबत संघटनेने यापूर्वीही अनेकदा निवेदने दिली असून ९ मे २०२५ रोजी आमरण उपोषणही केले होते. गोमातेला 'राज्यमाता' दर्जा प्राप्त झालेला असतानाही तेलहारा पोलीस स्टेशन आणि बीट प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गोवंशाची हत्या सुरूच असल्याचा दावा संघटनेने केला आहे. यामुळे हिंदू संघटनांचा स्थानिक पोलिसांवरील विश्वास उडाला असल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.



प्रशासनाच्या ढिलाईमुळे हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या जात असतील, तर आमच्याकडे आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही,ठ असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. भविष्यात होणाऱ्या कोणत्याही उद्रेकास तेलहारा पोलीस आणि महाराष्ट्र राज्य प्रशासन सर्वस्वी जबाबदार असेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, पालकमंत्री (अकोला), जिल्हा पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (अकोट) यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# मूर्तिजापुरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी २८ जानेवारी

**मूर्तिजापूर :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी वीर भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी हसतमुखाने फाशीचा स्वीकार केला. त्यांच्या याच महान बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहोत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाच्या मनात प्रखर देशाभिमान आणि राष्ट्रप्रेम जागृत असणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार हरीश पिंपळे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त 'वीर भगतसिंग मंडळ, बायपास' यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गुप्ता होते, तर शहर ठाणेदार अजित जाधव उपस्थित होते. नगराध्यक्ष हर्षल साबळे म्हणाले, मूर्तिजापूरला सुंदर व स्वच्छ बनवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून,



यात प्रत्येक नागरिकाचे सहकार्य मोलाचे आहे.

राज्यस्तरीय 'मूकनायक पुरस्कार' मिळाल्याबद्दल ज्येष्ठ प्रा. एल. डी. सरोदे यांचा आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मूर्तिजापूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवक यांचा सत्कार करण्यात आला. उप नगराध्यक्ष रोहित अस्वलवाले, नगरसेवक सचिन देशमुख, शालिनी रामाभाऊ हजारे, , राहुल गुल्हाने, मुकेश काळबांडे, कैलास महाजन, निलेश शर्मा, राम पाटील खंडारे, रवींद्र माडकर, गजानन पाटील नाकट, राम जोशी, निलेश वानखडे, यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जयस्वाल यांनी केले, प्रास्ताविक संजय भोलाशंकर गुप्ता यांनी केले तर आभार निरंजन गवई यांनी केले.

# सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज शिवनी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटी पातूर व्दारा संचलित सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल शिवनी येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शेख साबीर शेख मुसा (माजी पंचायत सदसय) होते. तर प्रमुख अतिथी नगर सेविका उज्वला शालीकराम पातोडे, प्रवीण शालीकराम पातोड माजी सरपंच शिवणी, नगर सेवक शेख समसू कमर, अहेमद खान पठान मोलाना अफसर सहाब व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

ध्वजारोहण मुख्याध्यापक यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर ८ वी ते १२ वी चे विद्यार्थी फिरदोस अंजुम सानीया परवीन,




अलविरा कौसर अनम खतुन, कुलसुम आरा सुहाना अंजुम, फयजान शाह शेख दानीश, नाजीया बी तनुजा परवीन, तहरीन अश्ना यांनी देश भक्तीवर गीत, सामुहिक कवायत, सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत केले. शाळेतील शिक्षक असीमोदीन यांनी सांगितले २६ जानेवारी आपल्या देशाच्या इतिहासातील सुवर्ण पान आहे. १९५० साली भारताने संविधान स्विकारले आणी खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राष्ट्र बनले. तंबाखु मुक्त व कॉपी मुक्त अभियन बाबत शपथ घेण्यात आली. मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल यांनी शिक्षणा विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी वक्तृत्व व कला स्पर्धा मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल वितरीत करण्यात आले. सुत्रसंचालन अकसा नाज सैयद अकील दानीया निसबत यानी केले तर आभार प्रदर्शन मो. अनवारोदीन यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक मोहम्मद जाहिद शमशेर खान, आकीब खान नाजनीन मीस व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# खेंडकर विद्यालयात प्रजासत्ताक दिन, महिला पालकांसाठी हळदी कुंकू व आनंद मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** सरस्वती नगर जुना वाशिम नाका बायपास रोड येथील खेंडकर ज्ञानगंगेत ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी अकोला रेडक्रॉस सोसायटीचे मानद सचिव प्रभजितसिंग बछेर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी डंबेल्स, कवायत, डंबेल्स, लेझीम ड्रिल सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. प्रजासत्ताक दिनी देशभर देशभक्तीचे वातावरण निर्माण होते, असे प्रतिपादन माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर यांनी केले. यावेळी विद्यार्थी, पालक मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सायकल मित्र क्लबचे अध्यक्ष गजानन खेंडकर होते. प्रमुख अतिथी विष्णुपंत





खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक व महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अल्केश खेंडकर उपस्थित होते. संस्थेचे कोषाध्यक्ष मृणाली खेंडकर, संस्थेच्या सहसचिव अस्मिता खेंडकर यांची उपस्थिती होती. दुपारच्या सत्रामध्ये महिला पालकांसाठी हळदीकुंकूचा कार्यक्रम घेण्यात आला. सोबतच विद्यार्थ्यांनी आनंद मेळाव्याचे आयोजन केले होते. यामध्ये नर्सरी ते वर्ग दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आनंद मेळाव्यातून खरी कमाई चे धडे घेतले. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गाच्या नुसार पैसे गोळा करून विविध खाद्यपदार्थाचे स्टॉल लावली होती. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यवहारिक जीवनाचा अनुभव घेऊन खाद्यपदार्थांचा मनसोक्त आनंद लुटला. कार्यक्रमाचे संचालन उषा जगदाळे यांनी केले तर आभार प्रज्ञानंद थोरात यांनी व्यक्त केले.



## बाळापुरला प्रजासत्ताक दिन साजरा

**बाळापूर:** येथील जयस्तंभ या ऐतिहासिक मध्ये आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. बाळापुर नगर परिषदेच्या अध्यक्ष डॉ. आफरीन परवीन मोहम्मद जमीर, उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य, माजी सैनिक, शालेय विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जय स्तंभावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. व रंगरंगोटी करण्यात आली होती. अबाल वृद्ध यांच्यामध्ये उत्साह होता.

## हुतात्मा स्मारक येथे ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनानी श्री विलासजी मुंजे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न



**अकोला:** भारतीय प्रजासत्ताकाच्या दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त स्थानिक हुतात्मा स्मारक येथे जेष्ठ स्वातंत्र्य सैनानी श्री विलासजी मुंजे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी जेष्ठ स्वातंत्र्य सैनानी श्री विलासजी मुंजे यांनी हुतात्यांना अभिवादन करून उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सहा.आयुक्त देविदास निकाळजे, सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, सुधीर माल्टे, दीपराज महल्ले, गौतम कांबळे, प्रवीण पाचपोर तसेच मनपा अघिकारी/ कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# सेंट पॉल्स अकॅडमीत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोट :** सेंट पॉल्स अकॅडमी येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला परेड व बँड पथकाच्या माध्यमातून पाहुण्यांचे आगमन झाले. त्यानंतर झेंडावंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या कोषाध्यक्षा रेखा चांडक होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून शारदा लाखोटिया, गजानन सावरकर (विस्तार अधिकारी, पं.स. अकोट), जयश्री बिहाडे, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, पर्यवेक्षक रिंकू अग्रवाल, अभिजीत मेंढे, सारिका रेळे, वैशाली गावत्रे व प्रभुदास नाथे यांची उपस्थिती लाभली.



विद्यार्थिनींनी स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायत सादर केली. डंबेल्स व लेझीमच्या आकर्षक सादरीकरणासोबत बँड पथकाने प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थिनींच्या चमूने देशभक्तीपर गीत सादर केले. नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनियर केजी, तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी भाषणे दिली. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सामूहिक नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी रश्मी बेराड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णाली सावरकर व श्लोक उगले यांनी केले तर आभार प्रदर्शन जानवी धारपवार यांनी केले.

# माऊली फांउडेशनतर्फे पोलीस विभागातील उत्कृष्ट कर्मचारी सन्मानित

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** कायदा- सुरक्षा करीता सतत कार्यरत असेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची माऊली फांउडेशन दरवर्षी दखल घेवून प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात पोलिसांना सन्मानित करीत असते . फांउडेशनच्या उपक्रमा प्रजासत्ताक दिनी सिटी कोतवाली पोलीस स्टेशन अंतर्गत आरती मोहन यादव, अनिता रमेश खडसे, शैलेश लक्षणराव घुगे या तीन पोलिस कर्मचाऱ्यांच्या कार्याची



दखल घेवून पोलिस निरीक्षक संजय गवई यांच्या हस्ते आकर्षक प्रशस्तीपत्र, बुके पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी फांउडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडेकर पदाधिकारी मंगेश लांडे , अजय बांडी , गोपालसिंग ठाकूर, गोकुल कंलत्री आदि मान्यवर व पोलीस विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते .

# गायत्री नगर मध्ये संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** स्थानिक कौलखेड रोड, गायत्री नगर, अकोला येथील संत तुकाराम महाराज बीजोत्स सेवा समितीची बैठक गायत्री मंदिराच्या प्रांगणात नुकतीच घेण्यात आली असून सर्वानुमते मागील पाच वर्षाप्रमाणे याही वर्षी संत तुकाराम महाराज बिजोसवाच्या शुभ-परवावर म्हणजेच दिनांक ५ मार्च ते १३ मार्च दरम्यान भव्य दिव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन ह भ प प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोहळ्यात स्वच्छता व पारदर्शकता




वाख्याण्याजोगी असून अकोला शहरच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील भाविकांना उत्सुकता आहे.

बैठकीला समितीचे सर्व कार्यकर्ते मंडळी व नव्याने सदस्यत्व घेतलेले मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कीर्तन महोत्सव सोहळा नऊ दिवसाचा असून दररोज महाराष्ट्रातील ख्यात्म नाम कीर्तनकारांचे कीर्तने आयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हा बीजेचा सोहळा होळी, धुलीवंदनाला लागून असल्यामुळे धुलीवंदन न खेळता यादरम्यान कीर्तन महोत्सव आध्यात्मिक वातावरणात परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात करण्यात येतो. या

# भिशीच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या कुरीज कंपनीवर कारवाई करण्याची मागणी

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला:** आपण व आपल्या अधिनस्त महिलाकडून भिशीच्या नावाखाली पैसे संकलित करून संकलित पैशाचा ड्रॉ वा ते परत न करता तसेच विक्रीकर विभाग व अन्य कोणत्याही विभागात कोणतीही नोंदणी न करता ते पैसे व्याज वापरून आर्थिक अपहार करणाऱ्या खदान परिसरातील कुरीज कंपनीची चौकशी करून आर्थिक अपहारग्रस्त आपण व आपल्या सांगण्यावरून भिशी टाकणाऱ्या ठेवीदार महिलांना प्रशासनाने न्याय देण्याची मागणी स्थानिक गुंतवणूकदार जया जयंत देशमुख यांनी केली.

कंपनीच्या आर्थिक अपहार संदर्भात जया देशमुख यांनी पत्रकार परिषदेत या कंपनीच्या एकंदर आर्थिक अपहाराची माहिती देण्यात आली. जया देशमुख यांनी व त्यांच्या ओळखीच्या महिलांनी कंपनीमध्ये वेगवेगळ्या



चिट ग्रुप मध्ये भिशी टाकल्या आहेत. परंतु गेल्या काही महिन्यापासून भिशीचे ड्रॉ देण्यासाठी ग्राहकांना टाळाटाळ करण्यात येत आहे. वेळेवर ड्रॉ निघत नाहीत. त्याचप्रमाणे प्रस्तुत भिशीची व आर्थिक व्यवहाराची कोणतीही नोंदणी विक्रीकर विभाग व अन्य विभागात केल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. आपण गेल्या ११ महिन्या पासून सुरळीत भरणा प्रस्तुत कंपनीमध्ये करीत असून त्याची आपणास कोणतीही पावती वा पासबुक देण्यात आलेले नाही. पावती मागितल्यावर टाळाटाळ करण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये चालू असलेल्या भिशी ड्रॉचा आजपर्यंत निकाल लागला नसून भिशीदारांचे पैसे अदा करण्यात आले नाहीत. या पैशातून कंपनीचे बेकायदेशीर व्याजाचे व्यवहार चालत असल्याचेही जया देशमुख यांनी यावेळी सांगितले. आपल्या मार्फत कंपनीमध्ये वीस लाखाच्या ग्रुप मध्ये तसेच पंधरा लाखाच्या वेगवेगळ्या ग्रुप मध्ये पैसे गुंतवण्यात आले आहेत. विश्वास ठेवून अनेक महिलांनी या कंपनीमध्ये लाखो रुपयांच्या भिशी टाकून पैसे गुंतवले आहेत. परंतु या भीशीचा कोणताही ड्रॉ करण्यात आला नसून या संदर्भात उडवाउडवीचे उत्तरे कंपनीकडून देण्यात येत आहेत. यामुळे महिलांनी आपल्याकडे पैसे परत करण्याचा तगादा लावला असून आपले मानसिक खच्चीकरण करणे सुरू केले आहे. या संदर्भात कंपनीला विचारले असता कंपनी उडवाउडवी व धमकीचे उत्तरे देत आहे. याप्रकारामुळे आपले व कुटुंबाचे आर्थिक व मानसिक नुकसान होत असून गुंतवणूकदार महिलांचे बोलणे ही आपणास खावे लागत आहे.

# शिवसेना वसाहत येथे प्रजासत्ताक दिन साजरा



प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला:** स्थानिक शिवसेना वसाहत प्रभाग क्रमांक १८ येथे प्रजासत्ताक दिवस साजरा करण्यात आला. ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ठआपला माणूसठ डॉ. अशोक ओळंबे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश पोलाखडे होते. ध्वजवंदन ज्येष्ठ नागरिक रामचंद्र धनभर यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवसेना वसाहत येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताक दिन व झेंडा वंदन कार्यक्रमाला रामचंद्र धनभर गणेश पोलाखडे गजानन चव्हाण संतोष चाटी दत्ता पाटील संतोष पोंध्ये दत्ता बावस्कर सागर पोलाखडे सागर खारेले सोनू धांदे ओम पोंदे उमेश लोकूरे संतोष दुबे गौरव सोनागरे धनंजय बुडूकुले ओम पोलाखडे साहिल देशमुख अनिकेत तांबट संदीप पोलाखडे आशिष तिवारी राजू पोलाखडे संग्राम मंडले मयूर सुलताने सुशील तिवारी यांचे सह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# आर्णीत भक्तीमय वातावरण; बाबा कंबलपोष उर्स शरीफची तयारी अंतिम टप्प्यात

प्रतिनिधी २८ जानेवारी

**आर्णी :** राज्यात सर्वधर्म समभावाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या थोर संत बाबा कंबलपोष यांच्या उर्स शरीफ (यात्रा महोत्सव) ला दि. ५ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत असून, या पार्श्वभूमीवर आर्णी शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. आर्णी तालुक्यासह यवतमाळ जिल्हा व राज्यातील विविध भागांतील भाविक या उर्सची आतुरतेने प्रतीक्षा करीत आहेत.

उर्सच्या निमित्ताने आर्णीतील सामाजिक जीवनातही चैतन्य निर्माण होते. लेकी-सुना माहेरी येतात, नातेवाईक व पाहुण्यांची ये-जा वाढते. त्यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता सामाजिक आणि भावनिक पातळीवरही आर्णीकरांसाठी महत्त्वाचा ठरतो.



दरगाह ट्रस्टच्या वतीने यंदा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी अमान साबरी (मुंबई), दि. ७ फेब्रुवारी रोजी शरीफ परवाज (कानपूर, उत्तर प्रदेश), तर दि. १० फेब्रुवारी रोजी शाकीब अली साबरी (गोंडा, उत्तर प्रदेश) यांच्या कव्वाली सादर होणार आहेत. याशिवाय दि. ८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खंजरी भजन स्पर्धा आणि दि. ९ फेब्रुवारी रोजी समाजप्रबोधनकार व कीर्तनकार पुरुषोत्तम पाटील (बुलढाणा) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

बाबा कंबलपोष दरगाह ट्रस्ट वर्षभर सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवित असते. उर्स काळात दि. ५ ते १० फेब्रुवारी दरम्यान मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली असून, भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उर्सदरम्यान शहरातील स्वच्छता व सुव्यवस्था राखण्यासाठी आर्णी नगरपरिषद व पंचायत समितीची पथके विशेष कार्यरत राहणार आहेत. तसेच सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेसाठी आर्णी पोलीस प्रशासनाने नियोजन सुरू केले असल्याची माहिती देण्यात आली.

# नो पार्किंग झोन : 20 पैकी तीन ट्रॅव्हल्सवर कारवाई

## आरटीओ व वाहतूक विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष

प्रतिनिधी २८ जानेवारी

**उमरखेड :** बसस्थानक परिसरातील नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सवर आर.टी.ओ. विभागाने दंडात्मक कारवाई केली असली, तरी तेवढी कारवाई नेहमीची झाली आहे. दिनांक २० जानेवारी रोजी आर.टी.ओ. विभागाने अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्सवर ४,५०० रुपये दंड ठोठवले. परंतु, बस स्थानक परिसरात दररोज उभ्या असलेल्या १० ते २० ट्रॅव्हल्सवर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांनी फक्त तीन ट्रॅव्हल्सवर कारवाई केली आणि उर्वरित वाहतूकदारांवर कोणतीही कारवाई का केली नाही असा सवास उपस्थित होत आहे. प्रहार जनशक्ती पक्षाने इशारा दिला आहे की, सदर स्थितीतील शिथिल कार्यवाहीमुळे प्रशासनावर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित होईल आणि या प्रकरणात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

यवतमाळकडे चालणाऱ्या ट्रॅव्हल्सचे २०० मीटरच्या आत प्रवासी भरण्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. आर.टी.ओ. अधिकाऱ्यांनी २०० मीटरच्या बाहेर ट्रॅव्हल्स उभ्या करण्याची सूचना दिली होती, पण त्याचा काही फरक त्यातल्या चालकांवर पडला नाही. वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांवर आरोप केले जात आहेत की, ते कधी कधी बस स्थानक परिसरात बंदोबस्त करत असतानाही अवैध ट्रॅव्हल्सवरील ठोस कारवाई करत नाहीत, ज्यामुळे नागरिकांमध्ये संताप आहे.



### आर.टी.ओ. अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद

■ या अवैध प्रवासी वाहतुकीमागे आर.टी.ओ. विभागातील अधिकारी आणि वाहतूक शाखेतील कर्मचारी यांची भूमिका संशयास्पद आहे. यामध्ये आर्थिक देवाण-घेवाणीच्या मोबदल्यात ट्रॅव्हल्स चालकांना मोकळे रान दिले जात असल्याचे नागरिकांकडून आरोप झाले आहेत.

### आगार व्यवस्थापकाचा कानाडोळा

■ उमरखेड आगार व्यवस्थापकाने वाहतूक विभागाकडे तात्काळ कार्यवाही करण्यासाठी अनेक पत्रे दिली आहेत, पण वाहतूक विभागाने त्यावर कोणताही ठोस प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाच्या राहुल मोहितवार यांनी वाहतूक विभागावर गंभीर आरोप केले आहेत.

# भाजपाकडून ओबीसी नेतृत्वाला बळ; जिल्हा उपाध्यक्षपदी महादेवराव गर्जे

प्रतिनिधी २८ जानेवारी



**बाभुळगाव :** भारतीय जनता पार्टीने ओबीसी समाजाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ देत मादनी (ता. बाभुळगाव) येथील महादेवराव गर्जे यांची जिल्हा ओबीसी आघाडीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रफुल चव्हाण यांच्या हस्ते गर्जे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

तळागाळातील कार्यकर्त्यांशी थेट संपर्क ठेवत सातत्याने राजकीय, सामाजिक व संघटनात्मक कार्य करणाऱ्या गर्जे यांच्या कार्याची दखल घेत भाजपाने ही महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याचे बोलले जात आहे. पक्षाप्रती निष्ठा, संघटन कौशल्य आणि ओबीसी समाजाच्या प्रश्नांबाबतची ठाम भूमिका ही या नियुक्तीमागील प्रमुख कारणे असल्याचे पक्षाच्या वर्तुळातून सांगण्यात आले. गर्जे यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील ओबीसी आघाडी अधिक सक्रिय होईल, संघटनात्मक ताकद वाढेल आणि भाजपाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यास अधिक गती मिळेल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष प्रफुल चव्हाण यांनी व्यक्त केला. या नियुक्तीमुळे तालुक्यासह जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात सकारात्मक हालचालींना वेग आला असून भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून महादेवराव गर्जे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मेटिखेडा येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात



प्रतिनिधी २८ जानेवारी

**कळंब :** तालुक्यातील मेटिखेडा येथील अप्पर तहसील कार्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या भव्य पटांगणामध्ये नायब तहसीलदार अनिल राजगुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सोहळ्यात प्रमुख उपस्थिती होती वडगाव जंगल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास दांडे, शासकीय कर्मचारी, गावातील गणमान्य नागरिक, सरपंच राणीताई कुरसंगे, मिठीखेडा खंडाचे मंडल अधिकारी, आणि सर्व तलाठी उपस्थित होते.

वडगाव जंगल पोलीस स्टेशनकडून मानवंदना देण्यात आली, तर नायब तहसीलदार अनिल राजगुरे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास दांडे यांनी सर्व उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषद शाळा यांच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

चिमुकल्यांनी देशभक्ती गाण्यावर नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधले. चिमुकल्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी बक्षीसे देण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार: अनिल राजगुरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक: विकास दांडे, सरपंच: सौ राणीताई कुरसंगे, मंडल अधिकारी, शासकीय कर्मचारी आणि तलाठी वर्ग, गावातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# पत्रकार संभा मडावी यांना 'आदिवासी समाज भूषण पुरस्कार'



प्रतिनिधी २८ जानेवारी

**पांढरकवडा :** सामाजिक कार्य, पत्रकारिता आणि भीमगीत गायनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता संभा मडावी यांना 'आदिवासी समाज भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम बचत भवन हॉल, नगर परिषद पांढरकवडा येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन प्रेस क्लब पांढरकवडा तसेच आदिवासी समाज मित्र परिवार पांढरकवडा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिष उर्फ सोनू बोरेले होते. उद्घाटक म्हणून रॉबिन बन्सल (भा.पो.से.), उपविभागीय पोलिस अधिकारी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून शंतणु दुधाडे (कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग), वैशाली सातुरवार (वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय), लहुजी तावरे (पोलिस निरीक्षक, पांढरकवडा), प्रविण पिन्नयवार व रघुनाथ सिडाम मार्थाजरूनकर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमात फिल्मी गीते, भावगीते, भीमगीते व भक्तिगीते मोठ्या उत्साहात सादर करण्यात आली.

यामध्ये संभा मडावी, प्रज्ञा रामटेके (कुंभारे), अरुण नरांजे, छाया पुराणिक, सुधीर मडावी, सिद्धार्थ कांबळे, अजय शामकुवर, चंदा नरांजे व प्रविण कनाके यांनी आपल्या सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रेस क्लब पांढरकवडा व आदिवासी समाज मित्र परिवार यांनी अथक परिश्रम घेतले. विशेष सहकार्य वन विभागाचे क्षेत्ररक्षक अधिकारी जीवन मेश्राम व सुरेश मुंडाले तसेच त्यांच्या चमूने केले.

# केळापूर तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहिर



प्रतिनिधी २८ जानेवारी

**पांढरकवडा :** केळापुर तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी २५ जानेवारी रोजी विश्रामगृह, पांढरकवडा येथे झालेल्या सदस्य सभेत गठीत करण्यात आली. या सभेचे आयोजन पत्रकार वेलफेअर असोसिएशन, पांढरकवडा (र.नं. एफ २०९३१) द्वारे करण्यात आले होते. सर्वानुमते राजू बेतवार यांची अध्यक्षपदी, संजय औदार्य यांची उपाध्यक्षपदी, ओमेश दर्शनवार यांची सचिवपदी निवड करण्यात आली. याशिवाय कोषाध्यक्षपदी सुधीर कोचे तर सदस्य म्हणून दीपक तावरे, रवि दर्शनवार, रफिक खान, अरुण गोडे, राहुल वऱ्हाडे आणि योगेश पडोळे यांचा समावेश करण्यात आला आहे. नवीन कार्यकारिणीने २०२६ साठी ग्रामीण व शहरी क्षेत्रातील पत्रकारितेतील सामाजिक समस्यांचे उकल, तसेच विविध सामाजिक सेवा उपक्रम राबविण्याचे उद्दिष्ट स्वीकारले आहे. केळापुर तालुका पत्रकार संघ सदैव स्थानिक समस्यांवर आवाज उठवण्यास अग्रेसर राहिला आहे.

# गुड मॉर्निंग ग्रुपकडून आरोग्य, सामाजिक बांधिलकीचा जागर

प्रतिनिधी २८ जानेवारी



**आर्णी :** "सकाळी उठा, योगा करा आणि आरोग्याची निगा राखा" या ब्रीदवाक्यानुसार आरोग्य संवर्धन व सामाजिक उपक्रमात सदैव अग्रेसर असलेल्या गुड मॉर्निंग ग्रुपचा चौथा वर्धापन दिन आर्णी येथील राज पॅलेस येथे साजरा करण्यात आला.

गुड मॉर्निंग ग्रुप केवळ आरोग्यापुरताच मर्यादित न राहता सामाजिक जबाबदारीचे भान जपत विविध उपक्रम राबवत असतो. याच अनुषंगाने यावर्षी आर्णीचे भूमिपुत्र व 'ज्योती कॅन्सर रिलीफ फंड'चे संस्थापक सतीश मुस्कुंदे यांचा त्यांच्या पत्नीसमवेत सन्मान करण्यात आला. कॅन्सरविषयी संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती निर्माण करणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने ३० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. यामध्ये ग्रुपकडून १०,००० रुपये, अनिस बेग, किशोर बोरगांवकर, श्रीकांत गीते व विश्वास सवने यांनी प्रत्येकी ५,००० रुपये अशी मदत दिली. यावेळी ग्रुपच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष : राजू वाडेकर, उपाध्यक्ष : सुरेंद्र गावंडे, उमेश राठोड, सचिव : मनोज बाईस्कार, कोषाध्यक्ष : विठ्ठल राऊत, इव्हेंट मॅनेजमेंट : कमलेश अस्वार, प्रसिद्धी प्रमुख : पत्रकार विनोद सोयाम यांचा समावेश आहे. कार्यक्रमात ग्रुपच्या वतीने अनेक सदस्य व त्यांच्या सहचारिणींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अनिस बेग, विनोद माहेश्वरी, अमोल मांगुळकर, राहुल माहुरे, राजू वाडेकर, अतुल देशमुख, संजय ठाकरे, पत्रकार विनोद सोयाम, सुरेंद्र गावंडे, उमेश राठोड, विठ्ठल राऊत, संतोष पिल्लेवार, प्रीतम जोशी, मनोज बाईस्कार, अमोल तायडे, अनिल सुकले, अक्रम गौरी, प्रविण विंचुरकर, कमलेश अस्वार यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले.

पुढील सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम, उखाणे, विविध नृत्यप्रकार व मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात रंगत आली. अध्यक्ष राजू वाडेकर व त्यांच्या पत्नीकडून उखाणे घेऊन आकर्षक भेटवस्तू देत सदस्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अमोल मांगुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन पत्रकार विनोद सोयाम यांनी मानले.

# महादीप परीक्षेतील यशस्वी श्रेया-दिव्याचा सत्कार

प्रतिनिधी २८ जानेवारी

## चालगणीच्या शाळेला आ. किसनराव वानखेडे यांची भेट

**उमरखेड :** चालगणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला आमदार किसनराव वानखेडे यांनी अकस्मात भेट दिली. यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत घेण्यात आलेल्या महादीप परीक्षेत घवघवीत यश संपादन करून 'विमानवारी'साठी पात्र ठरलेल्या कु. श्रेया प्रशांत कदम व कु. दिव्या दीपक नरवाडे या विद्यार्थिनींचा सत्कार केला.

एकाच शाळेतील दोन विद्यार्थिनी उच्च गुणांसह उत्तीर्ण झाल्याबद्दल आमदार वानखेडे यांनी शाळेचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षक व सर्व शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील शाळा गुणवत्ता-पूरक शिक्षण देत विद्यार्थ्यांची जडणघडण करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा उपस्थित होते. त्यांनीही श्रेया कदम व दिव्या नरवाडे यांचा सत्कार केला. याप्रसंगी माजी आमदार विजयराव खडसे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश चव्हाण, ॲड. अनिल माने, सुदर्शन रावते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष काटे, ग्रामपंचायत सदस्य बाबाराव कदम, पंजाब कदम यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



■ आमदार वानखेडे यांच्या अकस्मात भेटीमुळे शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकवर्ग सुखावला. यावेळी शाळेच्या वतीने आमदार किसनराव वानखेडे व जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना रंगमंच; जि.प. शाळा बेलखेड येथे सांस्कृतिक व स्नेहसंमेलन

प्रतिनिधी २८ जानेवारी

**पुसद :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बेलखेड येथे आयोजित सांस्कृतिक व स्नेहसंमेलन कार्यक्रम दि. २७ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मा. विजय बेतेवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास कुपटी केंद्रप्रमुख विजय मुंगे, सुकली केंद्रप्रमुख विजय इंगोले, मारलेगाव केंद्रप्रमुख संजय देशमुख, तरोडा केंद्रप्रमुख आनंद देशमुख, देवकते सर तसेच नुकतीच पीएच.डी. पदवी प्राप्त केलेले शिक्षक तय्यब शेख हे मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ व दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेच्या सुरक्षा भिंतीसाठी नागेश वाळूकर यांनी दोन फूट जागा उपलब्ध करून दिली, तर अत्यंत माफक दरात मंडपाची सुविधा लखन राठोड यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाची सुसूत्र रूपरेषा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल जाधव, शिक्षणतज्ज्ञ अंकुश वाळूकर तसेच मुख्याध्यापक सखाराम पाटील व मार्कड यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशात शाळेच्या शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे योगदान लाभले. या सांस्कृतिक व स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून शाळा व समाज यांच्यातील सहकार्याचे सुंदर चित्र दिसून आले असून शाळेच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा व चालना मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.




# घरफोडीत सोन्या-चांदीचे दागिने लंपास

प्रतिनिधी २८ जानेवारी

**यवतमाळ :** अवधुतवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोसा रोडवरील रेणुका पेट्रोलपंप परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून रोख रक्कम व सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली असून त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. फिर्यादी मोहम्मद युसुफ शेख हसन रा. यवतमाळ हे कुटुंबीयांसह नातेवाईकांच्या लग्नासाठी बाहेरगावी गेले होते. या संधीचा फायदा घेत २५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ८.३० ते रात्री ११.४५ या दरम्यान चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलूप व कोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटांची झडती घेत १ लाख ५० हजार रुपये रोख व ५४ हजार ८७४ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ४ हजार ८७४ रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. घटनेची माहिती मिळताच अवधुतवाडी पोलीस ठाण्यात अप क्र. ८०/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. २८ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**वाशीम:** ७७ वा प्रजासत्ताक दिन जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्याहस्ते ध्वजवंदन संपन्न झाले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, परिविक्षाधीन भाप्रसे अधिकारी आकाश वर्मा, उपजिल्हाधिकारी दीपक बाजड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरसकर, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त डॉ बाबुराव बिक्कड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा, सहाय्यक जिल्हा सुचना व विधी अधिकारी नेमसींग तोमर, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड , विधी अधिकारी महेश महामुने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित माजी सैनिक, पत्रकार, अधिकारी व कर्मचारी यांची सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या व परेड निरीक्षण केले. संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व नायब तहसीलदार अर्चना घोळवे यांनी केले.

# धडकले वरिष्ठांचे पत्र, सुरू झाले कारवाईचे सत्र !

## *रिसोड तालुक्यातील पोकरा गैरप्रकरणात प्रशासन ॲक्शन मोडवर * दोषीं कर्मचारी निलंबनाच्या चक्रव्युहात

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•




जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेतील कथित गैरप्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. तपास अधिकारी अनिल राठोड यांनी प्राथमिक चौकशी करून त्यासंबंधित गोपनीय अहवाल कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे पाठवला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने केलेल्या तक्रारीतून पोकरा घोटाळ्याचे बिंग फुटले असून प्रशासन दोषींवर कारवाई करण्याच्या ?क्शन मोडवर असल्याची माहिती समोर येत आहे. त्यातच कृषी विभागातील १६ पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांवर गंभीर गैरव्यवहार, कर्तव्यात कसूर आणि बोगस निविष्ठा प्रकरणात वरिष्ठ स्तरावरून पत्र धडकले असल्याची विश्वसनीय माहिती समोर येत आहे. त्या अनुषंगाने लवकरच कारवाईचे सत्र सुरू होणार असल्याचे बोलले जात आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. येथील शेतकरी वसंत खडसे यांनी वरिष्ठांकडे पुराव्यासहित तक्रार दाखल केल्यानंतर जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याला वाचा फुटली आहे. सदर प्रकरणात वरिष्ठ स्तरावरून चौकशी समिती नेमण्यात आली असून तपास अधिकारी म्हणून तंत्र अधिकारी अनिल राठोड यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. चौकशी दरम्यान बोगस फळबाग, नियमबाह्य सिंचन विहिर, खोटे दस्तऐवज जोडून एकाच कुटुंबाने लाटलेले लाखों रुपयांचे अनुदान या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे. त्या संदर्भातील गोपनीय चौकशी अहवाल विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती सबंधित कार्यालयीन सूत्रांनी दिली आहे. आता या गंभीर प्रकरणात कारवाई कधी होणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले जात आहे. जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून, दलालांची घरे भरणाऱ्या कृषी विभागतील दोषीं कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करून शासनाचा नियमबाह्य निधी हडपणाऱ्यांवर सुद्धा फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात यावीत अशी मागणी जोर धरत आहे.

निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. संपूर्णतः नैसर्गिक वातावरणावर अवलंबून असलेला शेती व्यवसाय हा अंदरबट्यातील व्यवसाय म्हणून गणल्या जात आहे. परिणामी शेतकरी कायमस्वरूपी आर्थिक संकटात पिचल्या जात आहे. कर्जाचा बोजा वाढत असल्याने शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगाने विविध योजना आखल्या जात आहेत. त्यातील एक महत्वाकांक्षी योजना म्हणून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना आहे. सदर योजना पारदर्शकपणे राबविल्या गेली तर या योजनेतील समाविष्ट गावातील शेतकऱ्यांचा कायापालट होतो एव्हढी क्षमता असलेली ही योजना आहे. मात्र कर्तव्यात हलगर्जीपणा आणि क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या भ्रष्टकर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्वार्थापोटी या महत्वाकांक्षी योजनेची वाट लागली असल्याचे शेलुखडसे येथील गैरप्रकाराने उजागर झाले आहे. सन २०२६ पोकरा भाग दोन योजना कार्यान्वित झाली असून किमान या योजनेत तरी घोटाळा होऊ नये यासाठी गैरप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी अपेक्षा योजनेच्या लाभापासून वंचित ठेवलेले शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### रक्षकच बनले भक्षक, कृषी अधिकाऱ्यानेच लाटला निधी...

कृषी आयुक्तालयातील एका उच्च अधिकाऱ्याने शेतकऱ्यांच्या अनुदान निधीधीचा गैरवापर केल्याचे मे २०२५ मध्ये सिद्ध झाले आहे. कृषी आयुक्तालयातील दक्षता पथकाच्या प्रमुखपदावरून उचलबांगडी करण्यात आलेल्या एका उच्च अधिकाऱ्याने शेतकऱ्यांच्या अनुदानाचा निधी थेट स्वतःच्या वैक्तिक बँक खात्यात वर्ग केला असल्याचे तत्कालीन चौकशीत निष्पन्न झाले आहे. गैरव्यवहाराची ही नवी शक्कल उघड झाल्यामुळे कृषी विभागतील वरिष्ठ अधिकारी सुद्धा कमालीचे हबकले होते. परिणामी संपूर्ण राज्यात एकूण ७८ कंपन्यांच्या मदतीने सुमारे १६९ कोटींचा मोठा आर्थिक घोटाळा झाला असल्यचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यामुळे या गंभीर प्रकाराची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली होती. सदर चौकशीत रक्षकच बनले भक्षक हे सिद्ध झाले आहे. आता हाच पॅटर्न वाशिम जिल्ह्यात तर वापरला गेला नाही ना ! असा संशय व्यक्त होत आहे. त्यातच अनेक कर्मचारी चुकीच्या कामामुळे आणि कामातील अनियमिततेमुळे चौकशीच्या कचाट्यात सापडले असून सदर दोषीं कर्मचाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार अद्यापही कायम आहे.

### 'सिटी न्युज सुपरफास्ट'चा... सततचा पाठपुरावा..!

पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले या टॅग लाईनद्वारे सिटी न्युज सुपरफास्टने कृषी विभागानेच योजनेची माती केली असून कुंपनानेच खाल्ली शेती अशा प्रकारच्या ६३ वृत्तांची वृत्त मालिका प्रकाशित करून सततचा पाठपुरावा सुरूच आहे. त्यामुळे १७ -१८ कृषी सेवकांवर निलंबनाची कारवाई प्रलंबित आहे.




## थोडक्यात

### स्व.किसनराव सदार विद्यालयात प्रजासत्ताक दिन




•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

तालुक्यातील खडकी सदार येथील स्व. किसनराव सदार विद्यालयात प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. स्वाती ज्ञानेश्वर सदार होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष संजूभाऊ सदार, सचिव संदीप सदार, मुख्याध्यापक जाधव, डॉ. ज्ञानेश्वर सदारआदींची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ स्वाती ज्ञानेश्वर सदार अध्यक्षा (संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार) प्रमुख पाहुणे श्री संजू भाऊ सदार( उपाध्यक्ष संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार) तसेच संदीप भाऊ सदार( सचिव संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार )प्रमुख मार्गदर्शक जाधव सर (मुख्याध्यापक )प्रमुख उपस्थितीमध्ये डॉक्टर ज्ञानेश्वर पाटील सदार , दीपक भाऊ सदार गणेश भाऊ सदार , सचिन सदार, (तंटामुक्ती अध्यक्ष)श्री वायाळ सर , बकाल सर फुपाटे सर, वाठोरे सर (स्काऊट शिक्षक,) खडसे सर मंगेश कोरडे ,माधव मार्कड , शंकर सदार, (पत्रकार) हरिभाऊ बाजड, एकनाथ सदार ,राजू भारते, सुरेश सदार,भागवत सदार, संदीप सदार लुडोजी धांडे, संदीप भाऊ धांडे ,विजय धांडे, दिलीप चोकटे, शिवा काका सुरुशे. माधव पाटील सदार ,ओम प्रकाश धांडे,कार्तिक सदार (माजी विद्यार्थी.)इत्यादी नागरिक उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री फुपाटे सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉक्टर ज्ञानेश्वर पाटील सदार यांनी मानले अशा प्रकारे आमच्या विद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# ...अखेर 'टेम्पल गार्डन' होणार सुरू !

## *पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केली पाहणी * भरघोस निधीसाठी पाठपुराव्याचे आश्वासन



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशिम शहरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या टेम्पल गार्डनची पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी पाहणी करून प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी उद्यानातील विविध सुविधांची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, नगरपालिका सह आयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपनगराध्यक्ष राजू भांदुर्गे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.पाहणीदरम्यान उद्यानातील स्वच्छता, हिरवळ, चालण्याचे मार्ग, प्रकाशव्यवस्था तसेच नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या इतर सोयी-सुविधांबाबत पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या. टेम्पल गार्डन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे आणि



नागरिकांसाठी विरंगुळ्याचे महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे दर्जेदार व टिकाऊ विकासकामे होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी शासनामार्फत टेम्पल गार्डनच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल, असे स्पष्ट केले. तसेच जनतेच्या सेवेसाठी टेम्पल गार्डनचे दालन लवकरात लवकर खुले करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. नगरविकास विभागाकडे आवश्यक तो पाठपुरावा निश्चितच केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.या पाहणीमुळे टेम्पल गार्डनच्या विकासाला गती मिळून लवकरच नागरिकांना आधुनिक व सुसज्ज उद्यानाचा लाभ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

टेम्पल गार्डन सुरू करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष गोविंद वर्मा यांनी पालकमंत्र्यांना निवेदन देवून भरघोस निधी देण्याची मागणी केली होती. त्यानुसार त्यांनी पाहणी केली.




### 'सिटी न्युज सुपरफास्ट'चा... सततचा पाठपुरावा..!

टेम्पल गार्डनमधील तारांगणाच्या व डम्पिंग ग्राऊंडच्या भ्रष्टाचाराची वृत्त मालिका सांध्य दै.सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्तांची वृत्त मालिका लावून धरून भ्रष्टाचार उघड केला. व टेम्पल गार्डन सुरू करण्यासाठी त्यानंतर डम्पिंग गाऊंडमधील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सततचा पाठपुरावा केला.

## मोप येथील शेतातील उभ्या पिकाचे अज्ञात व्यक्तीकडून नुकसान !

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•




रिसोड तालुक्यातील मोप येथील दिव्यांग शेतकरी अर्जून नरवाडे यांच्या शेतातील उभ्या असलेल्या तुर पिकाचे अज्ञात व्यक्तीकडून नुकसान करण्यात आले आहे. याची तक्रार नरवाडे यांनी रिसोड पोलिस स्टेशनला दिली.

तक्रारदार अर्जुन मोतीराम नरवाडे (वय ६१), रा. रिसोड, ता. रिसोड, जि. वाशिम यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान १८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ ते १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान करण्यात आले. अज्ञात व्यक्तीने शेतातील उभ्या पिकांची तोडफोड केल्याने शेतकऱ्याचे सुमारे ४,९०० रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेबाबत रिसोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत एनसीआर क्रमांक ००५२/२०२६ दिनांक १९/०१/२०२६ रोजी नोंद करण्यात आली आहे. घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## आज वाशिम येथे भव्य विदर्भस्तरीय बॉडीबिल्डींग स्पर्धा

### *स्व. मन्नासिंह ठाकूर बहूउद्देशिय संस्थेचे आयोजन *हजारो रुपयांच्या बक्षीसांची लयलुट

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



आजच्या युवकांनी व्यायामात सातत्य ठेवून आपले शरीर सदृढ, चपळ व निरोगी ठेवण्याच्या उद्देशाला चालना देण्यासाठी बॉडी बिल्डर्स ॲन्ड फिटनेस असोसिएशन विदर्भ, वाशिम जिल्हा बॉडी बिल्डींग असोसिएशनच्या वतीने व स्व. मन्नासिंह ठाकूर बहूउद्देशिय संस्थेच्या आयोजनातून येत्या बुधवार, २८ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता स्थानिक जिल्हा क्रीडांगणात भव्य विदर्भस्तरीय बॉडी बिल्डींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रसंगी आयोजीत कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून आमदार श्याम खोडे, अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजपा जिल्हा निवडणूक प्रमुख राजु पाटील राजे, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, संग्राम गावंडे यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, न.प. उपाध्यक्ष राजु भांदुर्गे, डॉ. अनिल कावरखे, भानुप्रतापसिंह ठाकुर, लक्ष्मणराव इंगोले, राजु वानखेडे, मनिष मंत्री, रामदास चांदवाणी, मिलींद भावसार, सोनाली रघुवंशी, ॲड. संतोष मालस, पुरण बदलाणी, गजानन गावंडे, नितीन मडके, पुरण बदलाणी, डॉ. प्रमोद कुमरे, गिरीष लाहोटी, प्रमोद राजुरकर, डॉ. प्रविण ठाकरे, मुकेश ठाकुर, दत्तराव गोटे, सुशिल बेदरकर, नितीन करवा, ॲड. नंदकिशोर पाटील, राहुल तुपसांडे यांची उपस्थिती राहील.

या स्पर्धेनिमित्त विजेत्यांसाठी हजारो रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आली तरी या स्पर्धेला क्रिडाप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन स्व. मन्नासिंह ठाकूर बहूउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष आशिष ठाकुर यांनी केले आहे.

## २६ जानेवारीला तिरंगा देशभर फडकला,

# शाखाधिकाऱ्याने उपशाखा, गार्डच्या दाखवला बहाणा, केनवड एस बि आय बँकेत तिरंगा न फडकता अडकला !

•प्रभाकर नाईकवाडे @ केनवड•

देशभरात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात, अभिमानाने आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा होत असताना केनवड येथील भारतीय स्टेट बँक (एँ) शाखेत मात्र या राष्ट्रीय पर्वाचा पूर्णपणे विसर पडल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सकाळी नियोजित वेळेत होणाऱ्या ध्वजारोहणासाठी ना शाखा अधिकारी उपस्थित होते, ना कर्मचारी. परिणामी प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणच झाले नाही. प्रजासत्ताक दिन हा देशाच्या संविधानाचा, लोकशाही मूल्यांचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रतीक मानला जातो. शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये, पोलीस ठाणे तसेच राष्ट्रीयकृत बँकांमध्येही या दिवशी ध्वजारोहण करून मानवंदना राष्ट्रध्वजाला देण्याची परंपरा आहे. मात्र केनवड येथील एसबीआय शाखेत संपूर्ण शांतता असून बँक परिसर ओस पडलेला दिसून आला. सकाळपासून नागरिक बँकेसमोर ये-जा करत होते; परंतु कुठेही राष्ट्रध्वज, सजावट किंवा हालचाल दिसून आली नाही. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

'राष्ट्रीयकृत बँकेने अशा पवित्र दिवशी ध्वजारोहण न करणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. हे केवळ कार्यक्रमाची दुर्लक्ष नसून राष्ट्रीय भावना दुखावणारे कृत्य आहे,' अशी प्रतिक्रिया काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, या घटनेला आणखी गंभीर बनवणारी बाब म्हणजे केनवड येथील भारतीय स्टेट बँक शाखेत यापूर्वी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्याही दिवशी ध्वजारोहण झाले नसल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ एकदाचा अपघात नसून राष्ट्रीय सणांकडे वारंवार होणाऱ्या दुर्लक्षाचा नमुना असल्याचा आरोप




नागरिकांकडून होत आहे. परिणामी, राष्ट्रीय सणांचा विसर पडतो की जाणूनबुजून कर्मचारी अशा कार्यक्रमांना टाळतात, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे. याबाबत शाखा प्रशासनाशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, 'शाखेत सध्या सुरक्षा रक्षक उपलब्ध नाही. तसेच ध्वजारोहणासाठी आम्ही केवळ तीनच कर्मचारी आहोत. त्यामुळे सुरक्षा कारणास्तव २६ जानेवारीला ध्वजारोहण करता आले नाही.' मात्र सुरक्षा रक्षक नसणे किंवा मनुष्यबळाची कमतरता ही कारणे राष्ट्रीय सणाच्या बाबतीत ग्राह्य धरता येतील का, असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. अनेक निमशासकीय कार्यालये अल्प मनुष्यबळातही साध्या पद्धतीने ध्वजारोहण पार पाडतात, हे वास्तव असताना केनवड शाखेत दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय सणांवर ध्वजारोहण न होणे ही बाब बँकेच्या प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

या घटनेमुळे आता भारतीय स्टेट बँकेच्या वरिष्ठ प्रशासनाकडून याची चौकशी होणार का, संबंधित शाखा अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवला जाणार का, तसेच दोषींवर कारवाई केली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राष्ट्रीय सणांचे पालन हे प्रत्येक शासकीय व राष्ट्रीयकृत संस्थेचे नैतिक आणि प्रशासकीय कर्तव्य असून भविष्यात अशा घटना पुन्हा घडू

### गार्ड नसणे कारण ठरू शकते का ?

'सुरक्षा रक्षक (गार्ड) उपलब्ध नाही, म्हणून २६ जानेवारीलाध्वजारोहण करता आले नाही,' असे शाखा प्रशासनाचे म्हणणे आहे.मात्र राष्ट्रीय सण साजरा करण्यासाठीगार्ड असणे अनिवार्य आहे,असा कोणताही शासकीय नियमकुठे अस्तित्वात आहे का? अनेक शाळा, ग्रामपंचायती,निमशासकीय कार्यालये व अल्प मनुष्यबळातील संस्थासाध्या पद्धतीने ध्वजारोहण करतात, मग राष्ट्रीयकृत बँकेनेचतिरंग्यापासून दूर राहणे हे योग्य कसे ठरू शकते? 'सध्या सुरक्षा रक्षक (गार्ड) उपलब्ध नाही.शाखेत केवळ तीन. कर्मचारी असल्यानेसुरक्षा कारणास्तव २६ जानेवारीला ध्वजारोहण करता आले नाही.'

**कमलेश मुजबाईल,**
शाखा अधिकारी,

## पर्यावरण शिक्षण उपक्रम कार्यक्रम राबविण्याबद्दल अभिजीत जोशी सन्मानीत

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



राष्ट्रिय हरित सेना योजने अंतर्गत पर्यावरण उपक्रम कार्यक्रम राबवून सक्रिय उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी तसेच एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमला जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. राष्ट्रीय हरित सेनेच्या कार्याची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील शाळांमध्ये पर्यावरण विषयक विविध उपक्रम राबविण्यात येऊन त्यामध्ये सुसूत्रता यावी आणि निरनिराळ्या शाळांमध्ये स्पर्धात्मक कृती निर्माण होऊन उपक्रमाची उत्कृष्ट गुणवत्ता वाढावी या हेतुने हरित सेनेच्या उपक्रमांत सहभागी हरित सेनेचे समन्वयक व शाळा यांना हा पुरस्कार देऊन सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने गौरविण्यात येते .शासकीय कार्यक्रमात सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय वाशीम येथे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड यांच्या मार्गदर्शनात सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने सन्मान चिन्ह व प्रमाण पत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या मंचावर वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे, मुख्य लेखापाल पंजाबराव जाधव, लेखापाल कपिल श्रृंगारे, लिपीक शेषपाल राठोड, नंदकुमार कोगदे, रणजीत आडे, वनपाल रेणुका केंद्रे, मंगलप्रसाद बेले, वनरक्षक संतोष जुमडे , भगवान वानखेडे अनिल लेमले, शिपाई गणेश राठोड, कार्यालयीन कर्मचारी देविदास पंडित ,माधव खंदारे, विजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल एस एम सी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा हरिभाऊ क्षीरसागर व प्राचार्य मीना उबगडे यांनी त्यांचे कौतुक केले आहे .

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# अजितदादांची अकाली 'एक्झीट'

## 26 नोव्हेंबर रोजी अजितदादांचा शेवटचा अकोला जिल्हा दौरा ठरला

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** अकोट नगरपालिकेच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार अकोला जिल्ह्यात आले होते. तो या भागातील त्यांचा शेवटचा दौरा ठरला.

दादांचे विमानतळावर महानगर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विजयभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वात स्वागत करण्यात आले. बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ते येथे आले होते.

यावेळी विधान परिषद सदस्य तथा विभागीय समन्वयक संजय खोडके, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अकोला महानगर अध्यक्ष विजयभाऊ देशमुख, माजी नगरसेवक गौतम गवई, मनोज गायकवाड, फैय्याज खान, संतोष डाबेराव, नितीन झापर्डे, अब्दुल रहीम पेंटर, अफसर कुरेशी, दिलीप देशमुख, बुढन गाडेकर, नकीर खान, अशोक परळीकर, महिला अध्यक्ष मंदाताई देशमुख, सुषमाताई निचळ, युवक अध्यक्ष अजय मते, अश्विनीताई यादमराळे, आकाश इंगळे, नितीन क्षिरसागर, गजानन मुरुमकार, यश सावल, प्रकाश खंडारे यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते. अकोटची सभा आटोपून अजितदादा खामगावला रवाना झाले होते. अनेक आठवणी मागे ठेवून दादा अनंताच्या प्रवासाला निघून गेले.








## अजितदादांची ती शेवटची अकोला भेट... अजित दादांच्या जाण्याने हळहळले अकोलावासी

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** राज्यातील नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारानिमित्त अजित दादांचे आगमन डिसेंबर महिन्यात अकोट येथे झाले होते सभेत दादांना ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते सभेदरम्यान अजित दादांनी केलेल्या सडेतोड भाषणाने सर्वच प्रभावित झाले होते अकोट शहरातील विकास कामे स्थानिक प्रश्न आणि आगामी योजनांबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केल्याने निवडणुकीला मोठी चालना मिळाली होती

अकोट मध्ये जाण्यापूर्वी त्यांचे अकोला शहरात आगमन झाले होते, अकोला विमानतळावर त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले होते त्यानंतर त्यांनी शहराच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महानगर कार्यालयाला भेट दिली होती याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे महानगर अध्यक्ष विजय भाऊ देशमुख यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले होते त्यांना शहराचे ग्रामदैवत राजेश्वर महाराजांची प्रतिमा सुद्धा भेट देण्यात आली होती अजित दादांना पाहायला मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयासमोर गर्दी केली होती विशेषता त्यात अजितदादांच्या लाडक्या बहिणीची उपस्थिती मोठ्या संख्येने पहावयास मिळाली कार्यकर्त्यांचे हे प्रेम पाहून दादा भारावून गेले होते दादांनी राज्यात लाडकी बहीण योजना राबवली होती यावेळी अनेक महिलांसोबत दादांनी व्यक्तिशः संवाद साधित लाडक्या बहिण बाबत तुम्ही खुश आहात ना असे विचारले होते आज त्यांच्या जाण्याने पवार परिवारासह त्यांचे राष्ट्रवादीचे लाखो कार्यकर्ते पदाधिकारी व राज्यातील लाखो लाडक्या बहिणींवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे

## महाराष्ट्राचे कणखर नेतृत्व हरपले : शिरीष धोत्रे



**अकोला:** अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रातील खंबीर आणि कणखर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे यांनी व्यक्त केली. धडाडीने निर्णय घेणारे नेते म्हणून दादांची ओळख होती. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी अमीट छाप पाडली होती असेही शिरीष धोत्रे म्हणाले.

## नगर परिषद निवडणूक प्रचारातील अजित पवार यांची सभा चर्चेत

वि प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोट :** अकोला जिल्ह्यातील अकोट नगर परिषद निवडणुकीदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या प्रचार सभेची आठवण सध्या नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या या सभेत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी उपस्थिती लावली होती. या सभेला शहरासह परिसरातील नागरिक आणि पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सभेदरम्यान अजित पवार यांनी विकासकामे, स्थानिक प्रश्न आणि आगामी योजनांबाबत आपली भूमिका स्पष्ट करत मतदारांना संबोधित केले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे निवडणूक प्रचाराला मोठी चालना मिळाली होती. या सभेमुळे पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते, असे अनेकांनी सांगितले.

## अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राची क्षती : आमदार साजीद खान पठाण

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** आजचा दिवस अतिशय दु:खद आहे.



अजितदादा यांच्या निधनाने झालेली हानी कधीही भरून न निघणारी आहे. एक उमदे व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना आमदार साजीद खान पठाण यांनी व्यक्त केली. पक्षभेद बाजूला ठेवून मदत करणारे अजितदादा होते. अकोला विमानतळ तसेच विकासासाठी त्यांनी निधी देताना त्यांनी तुम्ही कोणत्या पक्षाचे असे पाहिले नाही. सभागृहात दादांची उपस्थिती भारदस्त असायची. सदा हसतमुख, स्पष्टवक्ता म्हणून ते परिचित होते. दादांना श्रद्धांजली अर्पण करतो असे आमदार साजीद खान पठाण म्हणाले.

## अजितदादांचे निधन वेदनादायी : आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** स्पष्ट वक्ता, कार्यकर्त्यांचे मन जिंकणारा लोकनेता राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी ही वेदना देणारी दुःखदायी असल्याची प्रतिक्रिया आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केली. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून पवार परिवाराच्या दुःखामध्ये आपण सामील आहोत असे म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने फार मोठी हानी झाली. स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्याशी त्यांचे कौटुंबिक संबंध होते. ज्येष्ठ मार्गदर्शक आपण गमावला अशा शब्दात



जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी श्रद्धांजली अर्पण केली. जनतेच्या समस्या निराकरणासाठी आणि कार्यकर्त्यांचा भावना जाणून घेणारा लोकनेता तसेच धोत्रे व पवार परिवाराचे संबंध जोपासले. अकोला जिल्ह्याच्या विकासाला मदत करणारे अजित दादा पवार यांच्या निधनाने फार मोठी हानी झाली. माजी खासदार संजय भाऊ धोत्रे यांच्याशी दादांचे जवळचे संबंध होते अशी भावना खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली. पवार परिवाराच्या दुःखात आपण सामील आहोत आणि त्यांना दुःख सहन करण्याची ईश्वर ताकद प्रदान करो अशी प्रार्थना त्यांनी केली. आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, जयंत मसने, तेजराव थोरात यांनी सुद्धा दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्र शोक सागरात ....नरनाळा महोत्सव ही पुढे ढकलला

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी नऊ वाजे दरम्यान विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने संपूर्ण राज्यात शोक लहर पसरली असून त्यांचे चाहते स्तब्ध झाले आहेत. त्यांच्या अकाली निधनामुळे जिल्ह्यात नियोजित नरनाळा महोत्सव पुढे ढकलण्यात आला आहे. जिल्ह्यात ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तथापि, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे नरनाळा महोत्सव पुढे ढकलण्यात आला आहे, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सांगितले. त्यानुसार सर्व संबंधित सर्व कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत. याची नोंद घेण्याची अपील त्यांनी केली आहे

## अजितदादांचे निधन दुःखकारक : डॉ. प्रशांत वानखडे




**अकोला:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अकाली निधन अतिशय दुःखदायी आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर पवार कुटुंबियांना देवो अशी प्रतिक्रिया महानगर काँग्रेस अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे यांनी व्यक्त केली. काँग्रेसच्या वतीने दादांना श्रद्धांजली अर्पण केली.

## जिल्हा परिषदेत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री यांचे आज बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. शासनाने २८, २९ व ३० जानेवारी रोजी शासकीय दुखवटा जारी केला असून आज अकोला जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांना दुपारनंतर सुट्टी जाहीर केली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनानंतर जिल्हा परिषद मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी एकत्र येत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## वडाळी देशमुख ५ एकरातील ओव्याच्या गंजीला आग



प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोट :** वडाळी देशमुख येथील सावरा रोडवरील शेत शिवारात ५ एकर मधील कापून काढण्यासाठी लावलेल्या ओव्याच्या तीन गंजी पैकी २ गंजीला अज्ञात इसमाने आग लावली आहे. सावरा ते जुना आकोट रोडवरील लागून असलेले शेतकरी श्रीकांत तुळशीराम येवतकार यांच्या गट नंबर ३६०/ ३६१ या ५ एकर मधील सोंगनीला आलेला ओवा हा त्यांनी गेल्या ८ ते १० दिवसापासून सांगून ठेवला होता व तो १ दिवस अगोदर फ्रेशर ने काढू तर याच रात्रीत ओव्याच्या शेतामधील कापून ठेवलेल्या ३ गंजी पैकी २ मोठ्या गंजीला रविवार दि. २५ रात्री ९ ते १० च्या अंदाजे सुमारास गंजीला अज्ञान इसमाने आग लावण्यात आली आग एवढी मोठी भीषण होती की संपूर्ण गावांमध्ये या आगीचा तांडव दिसून आला सर्व गावकरी पाहण्यासाठी शेतात जमले होते यावेळी येवतकार गुरुजी यांचे ५ लाख रुपयांचे नुकसान झाले त्यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनला त्याच रात्री रिपोर्ट दाखल केला आहे. तात्काळ रात्रीला पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले व पुन्हा दुसऱ्या दिवशी ठाणेदार किशोर जुनगरे यांच्या मार्गदर्शनाखाली भास्कर सांगळे यांच्या चमूने पंचनामा केला.


## हिदायत पटेल खून प्रकरणात मोहम्मद बदरूजमा व संजय बोडखे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोट:** काँग्रेसचे नेते हिदायत पटेल यांच्या खून प्रकरणातील संशयित आरोपी मोहम्मद बदरूजमा व संजय बोडखे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी मंगळवारी फेटाळला.

या प्रकरणात मृतक हिदायत खाँ पटेल यांचा पुतण्या फिर्यादी फतेह अली खान रफतउल्ला खान पटेल रा. मोहाळा यांनी अकोट पोलिस स्टेशनमध्ये ०६.०१.२०२६ रोजी आरोपी विरूध्द फिर्याद दिली. की, ०६/०१/२०२६ रोजी दुपारी ०२:०० वा च्या सुमारास गावातील उबेद पटेल राजीक उर्फ कालु पटेल याने हिदायत पटेल यांच्यावर मशीदीत अचानक चाकुने प्राणघातक हल्ला केला. बदरूजम्मा मोहम्मद आदील, राजु विठ्ठलराव बोचे, संजय रामदास बोडखे, फाजील आसिफखा, फारूक आसिफखा यांच्यावर हिदायत पटेल यांच्या सांगण्यावरून संशय आहे. संशयित आरोपी म्हणून म्हणून नोंद केली. हिदायत पटेल यांना लोखंडे हॉस्पीटल मध्ये प्रथमोपचार करून अकोला येथे ओझोन हॉस्पीटल येथे उपचाराकरिता भरती केले. अशा रिपोर्टवरून खूनाचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. ०७.०१.२६ रोजी उपचारा दरम्यान हिदायतउल्ला खाँ यांचा मृत्यू झाला. वरील दोन्ही आरोपींनी अटकपूर्व जमानत मिळण्याकरिता अर्ज दाखल केल्यानंतर सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील आर. आर. उर्फ गिरीश देशपांडे यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात युक्तीवाद केला की, गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. गुन्ह्यातील संशयीत अर्जदार दोन्ही आरोपी फरार आहेत. संशयीत दोन्ही अर्जदार आरोपींनी गुन्ह्यात अटक असलेला आरोपी उबेद खाँ पटेल राजीक उर्फ कालु खाँ पटेल यास गुन्हा करण्याकरीता कशाप्रकारे व कोणते आमीष देवुन प्रवृत्त केले याबाबत सखोल तपास व्हायचा आहे. गुन्ह्यातील अन्य संशयीत आरोपी सुध्दा शहरातुन पळुन गेलेले आहेत. त्यांचा शोध घेवुन अटक करणे बाकी आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपअधीक्षक निखील पाटील व अकोट ग्रामीणचे पोलिस निरीक्षक किशोर जुनगरे हे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनात करीत असून तपास पुर्ण झालेला नाही. गुन्ह्यातील संशयीत दोन्ही आरोपी व गुन्हयातील इतर संशयीत आरोपी हे गुन्हयातील अटक आरोपी यास कुठे भेटले व गुन्हा करण्यापुर्वी कशाप्रकारे कट रचला याबाबत घटनाक्रम जाणुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील सर्व मुद्दे लक्षात घेता या संशयीत आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर करण्यात यावा असा युक्तीवाद सरकारतर्फे केला. सरकारी वकील अजित देशमुख व फिर्यादी तर्फे ॲड मुन्ना खान व ॲड. श्रीरंग तट्टे यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले तर आरोपी तर्फे ॲड. एस. एस. जोशी व ॲड. बि. के. गांधी यांनी युक्तीवाद केला व दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर वि. कोर्टाने दोन्ही संशयीत आरोपींचा अटकपुर्व अर्ज २७.०१.२६ रोजी नामंजुर केला आहे.

## डायनॅमिक नेते कायमचे निघून गेले : डॉ. अभय पाटील



प्रतिनिधी २८ जानेवारी

**अकोला :** महाराष्ट्राच नव्हे तर देशपातळीवर बहुचर्चित नेते म्हणून लौकिक मिळवलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे डायनॅमिक नेते काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना डॉ. अभय पाटील यांनी व्यक्त केली. गेली चाळीसहून अधिक वर्षे त्यांनी महाराष्ट्रात स्थान निर्माण केले होते. पवार कुटुंबीयांना दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो असेही डॉ. अभय पाटील म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK